# महाराष्ट्र विधानसभा

**तिसरे अधिवेशन, २०२३**

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

## सोलापूर (ता.जि.सोलापूर) शहरातील महात्मा गांधी प्राणी संग्रहालय सुरु करुन रिक्त पदे भरण्याबाबत

**(१) ३५२५० (०२-०२-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर (ता.जि. सोलापूर) शहरातील महात्मा गांधी प्राणी संग्रहालय महानगरपालिकाने सुरु करण्याचा निर्णय घेतला असून प्राणी संग्रहालयात अनेक पदे रिक्त असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी महात्मा गांधी प्राणी संग्राहलय सुरु करुन रिक्त पदे भरणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-१०-२०२३) :** (१) व (२) शासनाने दिनांक २८ डिसेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये सोलापूर महानगरपालिकेचा आकृतीबंध मंजूर केला असून त्यामध्ये झू डायरेक्टर, पशु वैद्यकीय अधिकारी, कनिष्ठ श्रेणी लिपिक, ॲनिमल किपर, शिपाई व माळी अशा संवर्गातील एकूण १० पदे मंजूर केली आहेत. तसेच सदरची पदे भरण्यासाठी ३५% खर्चाची अट शिथील केली आहे. त्यानुसार महानगरपालिकेकडून पदभरती प्रक्रिया राबवून रिक्त पदे भरण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

त्यानुसार सोलापूर महानगरपालिकेने पदभरतीसाठी TCS कंपनीशी दिनांक १३/४/२०२३ रोजी करार केला असून पदभरतीची जाहिरात देण्याची प्रक्रिया महानगरपालिकेकडून करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

## रवी व मुलुरचक या गावांचा नगर परिषद आरमोरी (जि. गडचिरोली) मध्ये समावेश करण्याबाबत

**(२) ४०२६५ (०१-०४-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अरसोडा गाव (जि. गडचिरोली) गट ग्राम पंचायतीचे मुख्यालय असल्याने नगर परिषद आरमोरी (जि. गडचिरोली) मध्ये समाविष्ठ झाल्याने गट ग्राम पंचायती मधील उर्वरीत रवी व मुलुरचक या गावांना कोणत्याही स्थानिक स्वराज्य संस्थेशी जोडण्यात न आल्याने दोन्ही गावातील नागरीकांना मुलभूत नागरी सुविधांपासून वंचीत रहावे लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू रवी व मुलुरचक या गावातील नागरीकांच्या मागणीनुसार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दोन्ही गावांचा नगर परिषद आरमोरी, (जि.गडचिरोली) मध्ये समावेश करण्याबाबत जिल्हाधिकारी गडचिरोली यांना दिनांक २५ नोव्हेंबर, २०२१ रोजी निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुसार उक्त गावांना नगर परिषद आरमोरी मध्ये समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-१०-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) जिल्हाधिकारी, गडचिरोली यांनी शासनास सादर केलेल्या प्रस्तावानुसार गडचिरोली जिल्ह्यातील मौजा रवि व मुलुरचक ही गांवे नगरपरिषद आरमोरीमध्ये समाविष्ट करण्याबाबत दिनांक २३ डिसेंबर, २०२२ रोजी प्राथमिक उद्घोषणा निर्गमित करण्यात आली आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गोंदिया जिल्हयातील सडक/अर्जुनी व अर्जुनी/मोरगाव नगरपंचायतअंतर्गत अतिक्रमणकारी यांना घरे उपलब्ध होणेबाबत

**(३) ४२२८९ (२५-०४-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सडक/अर्जुनी व अर्जुनी/मोरगाव (जि.गोंदिया) नगरपंचायतीच्या हद्दीतील शासकीय जमिनीवर मोठया प्रमाणावर अनेक वर्षांपासून अतिक्रमण करुन कच्ची घरे बांधून नागरिक राहत असले तरी "सर्वांसाठी घरे-२०२२" च्या धोरणानुसार जमिनीचा पट्टा नावावर नसल्या कारणास्तव, पंतप्रधान आवास योजना व रमाई घरकुल योजनेच्या लाभापासून वंचित आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नागरी क्षेत्रातील अतिक्रमण धारकांचे नावे जमिनीचे पट्ट्यांचे वाटप करुन शासकीय घरकुल योजनेचा लाभ संबंधित कुटुंबांना देणेबाबत शासनाचे नगरविकास विभागाचे दिनांक ६ मार्च, २०१८ चे शासन निर्णयाप्रमाणे अतिक्रमित जमिनीचे पट्टे नावावर करुन घरकुल योजनेचा लाभ देण्याबाबत नागरिकांनी केलेल्या मागणीला दोन्ही नगरपंचायतीकडून योग्य प्रतिसाद मिळत नसल्याबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने लोकप्रतिनिधींनी नगरपंचायतचे पदाधिकारी व अतिक्रमण धारकांची बैठक घेऊन घरकुलासाठी जमिनीचे पट्टे संबंधितांचे नावावर करुन देणेबाबत निर्णय घेऊनही एक वर्षांपासून नगरपंचायतीचे पदाधिकारी व अतिक्रमित जमिनवाटप समितीचे अध्यक्ष म्हणून जिल्हाधिकारी गोंदिया यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने धोरणानुसार अतिक्रमित जमिनीचे पट्टे वाटपाबाबत कार्यवाही न झाल्यामुळे दोन्ही योजनांचा पैसा जिल्हाधिकारी, गोंदिया यांचेकडे अद्याप अखर्चित आहे, हेही खरे आहे काय,
(४) असल्यास, संबंधित नगरपंचायतीचे अधिकारी व जिल्हाधिकारी गोंदिया यांचेविरुध्द कारवाई करण्याबाबत तसेच जमिनीचे पट्टे वाटपाची व घरकुल योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) हे खरे नाही.

सडक अर्जुनी येथील ३२४ लाभार्थ्यांना घरकुलांचा लाभ देण्यात आला असून १२१ लाभार्थ्यांचे जागेचे फेरफार प्रलंबित आहेत. तसेच ६९ लाभार्थ्यांनी शासकीय जमिनीवर अतिक्रमण केले असल्याचे दिसून आले आहे. याबाबत वन विभागाकडे सदर अतिक्रमणे नियमित करण्यासंदर्भात कार्यवाही सुरु आहे.

नगरपंचायत अर्जुनी अंतर्गत DPR नुसार एकूण ३२३ लाभार्थी पात्र ठरले असून त्यापैकी २६२ लाभार्थ्यांना पंतप्रधान योजनेचा लाभ देण्यात आला आहे. उर्वरित ६१ लाभार्थ्यांच्या संदर्भात त्यांच्या मालकी हक्काची कागदपत्रे अद्ययावत नसल्याने त्यांच्याबाबत कार्यवाही पूर्ण झालेली नाही
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सोलापूर महापालिकेला आमदार आणि भांडवली निधीतून मिळालेल्या नव्या रुग्णवाहिका आणि शववाहिका चालकाविना पडून असल्याबाबत

**(४) ४२७३९ (२७-०४-२०२२). श्री.समाधान अवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर महापालिकेला आमदार आणि भांडवली निधीतून मिळालेल्या नव्या सहा रुग्णवाहिका आणि चार शववाहिका चालकाविना उभ्या असल्याचे माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वाहनांवर किमान ३० चालक व सहकाऱ्यांची आवश्यकता असून केवळ ६ चालक कार्यरत असल्याने नवी वाहने पडून आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तातडीने चालक व सहकाऱ्यांची नियुक्ती करून रुग्णवाहिका व शववाहिका रुग्णांच्या सेवेत दाखल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०३-१०-२०२३) :** (१) व (२) हे खरे नाही.

सोलापूर महानगरपालिकेस मा.लोकप्रतिनिधी यांचेकडून उपलब्ध झालेल्या ६ रुग्णवाहिका व ४ शववाहिका करीता प्रशासनाने एकूण १८ वाहनचालक दिनांक ७/१२/२०२१ पासून कंत्राटी तत्वावर उपलब्ध करुन दिले आहेत.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबई एअरपोर्ट फनेल भागातील इमारतीचा पुर्नविकास करण्याबाबत

**(५) ४४६३४ (३१-१०-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.अमित झनक (रिसोड), श्रीमती गीता जैन (मिरा भाईंदर), श्री.रमेश कोरगांवकर (भांडूप पश्चिम), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई विमानतळाभोवती असलेल्या विलेपार्ले, सांताकुझ, अंधेरी आणि कुर्ला या परिसरातील भागाला 'एअरपोर्ट फनेल भाग' ओळखले जात असून, येथील सुमारे साडेचारशे इमारतीचा पुर्नविकास प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू परिसरातील 'एअरपोर्ट फनेल' वासियांना चार ते नऊ इतके अतिरिक्त चटई क्षेत्रफळ देण्याबाबत मुंबई महानगरपालिकेने सुमारे २० लाख रहिवाशांच्या सेस इमारतीच्या धर्तीवर नगरविकास विभागाला प्रस्ताव पाठवून दोन वर्षाहून अधिक काळ होऊनही आजमितीपर्यंत कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या परिसरात असणाऱ्या इमारती जीर्ण व मोडकळीस आल्या असल्याने त्यांचा पुनर्विकास करण्यात यावा अशी स्थानिकांची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, नगरविकास विभागाकडून इमारतीच्या पुर्नविकास संदर्भातील नियमावली अदयापपर्यंत प्रतिक्षेत राहण्याची कारणे काय आहेत,

(५) असल्यास, उक्त इमारतीच्या पुर्नविकासाला तातडीने गती मिळण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-१०-२०२३) :** (१) नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील फ़नेल झोनसह इतर क्षेत्रातील इमारतींचा पुनर्विकास करण्याबाबतचा प्रस्ताव विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मधील तरतूदींना अधिन राहून सादर केल्यास महापालिकेच्या संबंधित इमारत प्रस्ताव विभागाकडून सदरहू प्रस्ताव मंजूर करण्यात येतात.

फनेल झोन असलेल्या विलेपार्ले, सांताक्रुज व अंधेरी या परिसरातील २१ इमारतींचे पुनर्विकास प्रस्ताव महापालिकेला प्राप्त झाले असून सदर प्रस्तावास महापालिकेने नियमानुसार विकास परवानगी दिली असल्याचे तसेच फनेल झोन असलेल्या कुर्ला या परिसरातील इमारतींच्या पुनर्विकासासंबंधी २ प्रस्ताव महापालिकेला प्राप्त झाले असून त्याअनुषंगाने एका प्रस्तावात IOD दिली असून एक प्रस्तावात कागदपत्रांची पुर्तता करणेबाबत वास्तुविशारद यांना कळविले आहे. त्यानुसार सदर प्रस्तावावर महापालिकेने कार्यवाही केली असून सदर प्रस्ताव वास्तुविशारद यांचे स्तरावर प्रलंबित असल्याचे महापालिकेने कळविले आहे.

तथापि, बृहन्मुंबईमधील छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावरील विमानांच्या उड्डाणाच्या सुरक्षेकरिता एअरपोर्ट फ़नेल झोन मधील इमारतींवर उंचीचे निर्बंध घालण्यात आले असल्याने सदरहू क्षेत्रातील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासात (बेसिक + प्रिमियम एफ़एसआय + टिडीआर) परवानगीयोग्य संपुर्ण क्षेत्राचा वापर करणे शक्य होत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

(२), (३) व (४) विमानतळ परिसरातील एअरपोर्ट फ़नेल झोन मधील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासाबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेने दि.०९/०९/२०२१ रोजीचे पत्राद्वारे शासनास प्रस्ताव सादर केला आहे. महापालिकेच्या सदरहू प्रस्तावाचे अनुषंगाने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.३०/१२/२०२१ रोजीचे पत्राद्वारे अभिप्राय/ अहवाल प्राप्त झाले असून त्यामध्ये महापालिकेने सादर केलेला प्रस्ताव उचित नसल्याबाबत कळविले आहे. तसेच, महापालिकेचा प्रस्ताव व संचालक, नगररचना यांनी अभिप्रायामध्ये पुनर्विकासाबाबत सुचविलेला पर्याय यामध्ये एकवाक्यता नसून एक विशिष्ट प्रस्ताव स्विकारावा अशी बाब नाही.

तथापि, बृहन्मुंबई क्षेत्रातील उंचीचे निर्बंध असलेल्या एअरपोर्ट फनेल झोन मधील जुन्या इमारतींचा पुनर्विकास सुसह्य व्हावा याकरिता नियमावलीमध्ये विशिष्ट तरतूद करणे तसेच अशा प्रकारे इतर निर्बंध असल्यामुळे पुनर्विकासास अडथळा येत असलेल्या क्षेत्राचा पुनर्विकास करणे शक्य होण्याकरिता बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मध्ये स्वतंत्र तरतूद अंतर्भूत करणेची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) लागू नाही.

---

## पुणे महानगरपालिकेत समाविष्ट २३ गावांना मिळकत करात सवलत देण्याबाबत

**(६) ४७३३९ (२८-०९-२०२२). श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या २३ गावांना माहे एप्रिल, २०२२ पासून मिळकत कर लागू करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला असल्याचे दिनांक २७ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या समाविष्ट गावांत पाणी, रस्ते, वीज, सांडपाणी, कचरा यासह इतर समस्या असताना त्यांच्याकडून मिळकत कर घेणे योग्य नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जोपर्यंत येथे सदरील सुविधा दिल्या जात नाहीत तोपर्यंत मिळकत करात १७ ते २७ टक्के सवलत द्यावी, अशी मागणी येथे होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेऊन येथे मिळकत करात १७ ते २७ टक्के सवलत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०२३) :** (१) होय, महापालिका आयुक्त यांनी ठराव क्र.६/११९, दि.२७.०५.२०२२ अन्वये पुणे महानगरपालिकेमधील नव्याने समाविष्ट २३ गावांमधील मिळकतीची आकारणी माहे एप्रिल २०२२ पासून करणेसाठी प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

(२) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील कलम १२९ नुसार नवीन समाविष्ट २३ गावांमधील मिळकतीना कर आकारणी करणेची कार्यवाही सुरू आहे.

(३) होय
(४) मागणी नियमानुसार नसल्याने अशी सवलत दिली जात नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबईतील मागाठणे ते गोरेगांव (पूर्व) साईबाबा संकुलापर्यंतचा रस्ता "विशेष पायाभूत सुविधा प्रकल्प" अंतर्गत पुर्ण करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत**

**(७) ४९४७७ (१८-०१-२०२३). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मागाठाणे ते गोरेगांव (पूर्व) साईबाबा संकुलापर्यंतचा १२० फुटी विकास नियोजन रस्ता "विशेष पायाभूत सुविधा प्रकल्प" म्हणून घोषित करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २३ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू प्रकरणी लोखंडवाला कांदिवली दरम्यान रस्त्याच्या विकासाचे काम पूर्ण झाले असून, क्रांती नगर, कुरार, आप्पा पाडा येथील अतिक्रमणधारकांचे अन्यत्र पुनर्वसन करुन वाहतुक कोंडी टाळण्यासाठी रस्ता खुला करणे अत्यंत आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार वाहतूक कोंडी टाळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पी/उत्तर विभाग कार्यक्षेत्रातील १.६ कि.मी. लोखंडवाला ते गोरेगांव-मुलुंड लिंक रोड पर्यंतच्या ३६.६० मीटर रुंद विकास नियोजित रस्ता रुंदीकरणात एकूण १३७६ बांधकामे बाधीत होत आहेत. सदर बांधकामधारकांना कागदपत्रे सादर करण्याकरिता नोटीस देण्याची कार्यवाही सुरु असून कागदपत्रे प्राप्त झाल्यानंतर प्रारुप परिशिष्ट-II तयार करुन पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
सदर रस्त्यात बाधीत पात्र बांधकामधारकांचे पर्यायी पुनर्वसन करुन रस्ता विकसित केल्यास कुरार गावामधील गांधी नगर, आनंद नगर, माहेश्वर नगर, प्रथमेश नगर, क्रांती नगर, आप्पा पाडा या दाट झोपडपट्टीयुक्त परिसरात असलेल्या कुरार गावातील रस्त्यांवर होणारी वाहतूक कोंडी टाळणे शक्य होऊन वाहतुकीसाठी पर्यायी मार्ग खुला होणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मुंबई महानगरपालिका एच – पूर्व कार्यालयाच्या जलविभागात अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे कार्यालयीन कामकाजावर परिणाम झाल्याबाबत**

**(८) ५०१८७ (२०-०१-२०२३). श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई महानगरपालिका एच–पूर्व कार्यालयाच्या जलविभागात अपुऱ्या कर्मचारी वर्गामुळे येथील कार्यालयीन कामकाजावर परिणाम झाला असल्याची बाब दिनांक १२ सप्टेंबर, २०२२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर विभागातून देण्यात आलेल्या माहितीनुसार पालिका जलमापक निरीक्षक, दुय्यम अभियंता, कनिष्ठ अभियंता व काही कर्मचाऱ्यांची पदे गत काही वर्षापासून रिक्त असल्याने त्याचा परिणाम कार्यालयीन कामकाजावर झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे त्यानुसार महानगरपालिकेच्या जलविभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०२३) :** (१), (२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एच/पूर्व विभागाच्या जल विभागास आवश्यक असणाऱ्या एकूण १६० कर्मचाऱ्यांपैकी ६९ कर्मचारी कार्यरत असून, उर्वरित ९१ रिक्त पदे भरण्याची कार्यवाही सुरु आहे.

रिक्त पदांचे कामकाज उपलब्ध असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांच्यात समायोजित करुन कामकाज हानी थांबविण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानाची झालेली दुरवस्था

**(९) ५१११३ (२२-०१-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील वांद्रे (पूर्व) येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानाची दुरवस्था झाली असून याकडे स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिसरातील नागरिकांसाठी उपरोक्त उद्यानाच्या सौंदर्यकरण व सुशोभीकरणासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०२३) :** (१) व (२) वांद्रे (पूर्व) येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यानाचा विकास सन २०१९ मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आला आहे.

सदर उद्यानामध्ये हिरवळ, पदपथ, गझेबो, लहान मुलांना खेळण्यासाठी खेळणी, खुले व्यायामाचे साहित्य, आसन व्यवस्था इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत. सदर उद्यान बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत परिरक्षित केले जाते.

सद्य:स्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान हे सुस्थितीत असून तेथील सुविधांचा स्थानिक नागरिक मोठ्या प्रमाणावर उपभोग घेतात.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महापालिकातील कर सवलत बाबत

**(१०) ५१४९५ (२०-०१-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील मिळकतीना महापालिकेकडून दिली जाणारी ४० टक्के कर सवलत रद्द करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सवलतीपोटी देण्यात आलेली रक्कम महापालिकेकडून वसुली करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन मिळकत करातील सवलत कायम ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०२३) :** (१) नाही.
(२) नाही.

(३) महाराष्ट्र पुणे शहर महानगरपालिका कराधान (भूतलक्ष्मी प्रभावाने कराधान नियमांचे अधिनियम व सुधारणा आणि विधिग्राह्यीकरण) अधिनियम, २०२३ मध्ये मंजूर करण्यात आला असून सदर अधिनियम दि. २५.०२.२०२३ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यानुसार पुणे शहरातील मिळकतीना महापालिकेकडून दिली जाणारी ४० टक्के कर सवलत कायम करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे शहरातील रस्त्यांची झालेली दुरवस्था

**(११) ५१५२४ (२७-०१-२०२३). श्री.सुनिल टिंगरे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरामध्ये विमानतळ रस्ता येथील ५०९ चौकातील रस्त्यांची दुरवस्था झालेली असल्याने मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबधित महानगरपालिकेतील ठेकेदार व अधिकारी यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१०-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे. पुणे शहरातील मोठ्या प्रमाणावर झालेल्या पावसामुळे विमानतळ रस्त्यावरही काही ठिकाणी खड्डे पडले होते. तथापि, खड्ड्यामुळे अपघात घडून आल्याची घटना निदर्शनास आलेली नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळवले आहे.
(२) व (३) विश्रांतवाडी ते ५०९ चौक दरम्यान रस्त्याची महानगरपालिकेने तात्काळ दुरुस्ती करून डागडुजी केलेली आहे व वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेतलेली आहे.

सदर रस्त्यावर वाहतुकीची घनता दिवसेंदिवस वाढत आहे. ५०९ चौक ते विश्रांतवाडी चौक हा रस्ता, आळंदी रस्त्यास विश्रांतवाडी चौकात मिळतो. पुणे शहरातील पूर्व भागातील व विमानतळावरून पिंपरी चिंचवड शहराच्या दिशेने होणारी प्रवासी वाहतूक विचारात घेता सदर रस्त्यावर ओव्हर-ले कॉँक्रीटीकरण करण्याचा निर्णय पुणे महानगरपालिकेने घेतलेला असून नविन कॉक्रिट रस्त्याची रू.१८.२९ कोटी इतक्या रक्कमेची निविदा काढण्यात आलेली आहे. प्रत्यक्ष जागेवर कॉँक्रीटीकरण करणेचे काम प्रगतीपथावर आहे. ५०९ चौक ते सावंत पेट्रोलपंपा दरम्यान संपूर्ण कॉँक्रीटीकरणाचे काम मार्च, २०२४ अखेर पूर्ण करण्यात येणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरातील रस्त्याची व खड्डे बुजवण्याच्या कामांकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष

**(१२) ५१५८७ (२२-०१-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील रस्त्याची दुरुस्ती व खड्डे बुजविण्याकरिता वारंवार सूचना करूनही सार्वजनिक बांधकाम विभाग व नागपूर सुधार प्रन्यास या संस्थांनी दुर्लक्ष केल्यामुळे नागपूर महानगरपालिका रस्ते सुधारण्याचे काम हाती घेणार आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरच्या संस्थांनी रस्त्याच्या डागडूजीसाठी दुर्लक्ष करण्यामागील कारणे काय आहेत,

(३) तसेच नागपूर शहरातील नागरिकांना समस्या उद्भवू नये, यासाठी नागपूर शहरातील रस्ते सुधारण्यासाठी कोणता कालबद्ध कार्यक्रम आखण्यात आला वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) नागपूर सुधार प्रन्यासच्या अखत्यारीत येत असलेल्या नागपूर महानगरपालिकेच्या हद्दीतील ६५.२७ कि.मी रस्ते, २६.५१ मल्लनिसारण वाहिका, जलप्रक्रिया केंद्र व २६.२१ कि.मी. पर्जन्य वाहिका अशा रु.१८८.८० कोटी इतक्या किंमतीची विकास कामे प्रन्यासद्वारे नियोजन व कालबध्द कार्यक्रमाद्वारे हाती घेण्यात आली आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सेमिनरी हिल (जि.नागपूर) परिसरातील मोकळ्या जागेवर कचरा टाकल्याने स्थानिक नागरिकांचे आरोग्य धोक्यात आल्याबाबत**

**(१३) ५१५८९ (२२-०१-२०२३). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सेमिनरी हिल (जि.नागपूर) परिसरातील मोकळया जागेवर महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकडून कचरा टाकला जात असल्याने कचऱ्याचा ढिगारा तयार होऊन दुर्गंधीचा त्रास व त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२२ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणच्या नागरिकांच्या आरोग्यास धोका पोहोचू नये याकरिता कचऱ्याची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे अत्यंत गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे त्यानुसार अशा प्रकारे अनधिकृतपणे कचरा टाकून डम्पिंग यार्ड तयार करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) धरमपेठ झोन अंतर्गत सेमिनरी हिल ते फ्रेंन्डस कॉलनी घाटाकडे जाणारा रस्ता या खोलगट भागात डास उत्पती झाल्याचे निदर्शनास आल्याने सदर भाग सी ॲण्ड डी वेस्ट टाकून समतल करण्यात आला आहे. येथे कचरा टाकण्यात आला नसून नागरीकांकडून घरो घरुन कचरा संकलन व विल्हेवाट लावण्याकरिता महानगरपालिकेद्वारे कार्यवाही करण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नागपूर महानगरपालिकेच्या धरमपेठ येथील झोन कार्यालयातून विकासकामाची नस्ती गहाळ झाल्याने विकासकामे प्रलंबित असल्याबाबत**

**(१४) ५१९५९ (२७-०१-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर (जि.नागपूर) येथील "सदर" येथील ठाण्याजवळील रस्त्यावर पेविंग ब्लॉक लावायच्या कामाला महानगरपालिकेच्या अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभागाने परवानगी दिली असल्याचे माहे सप्टेंबर,२०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, धरमपेठ येथील महानगरपालिका झोन कार्यालयातून यासंदर्भातील नस्ती गहाळ झाल्यामुळे सदरील विकासकामे प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन सदरील प्रकरणातील दोषी अधिकारी-कर्मचारी यांच्यावर कारवाईसह सदरील विकास कामे मार्गी लावण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.
सदर येथील ठाण्याजवळील काम हे पेव्हर ब्लॉकचे नसून सी सी फ्लॉरींगचे आहे.
(२) हे खरे नाही.
सदर काम पूर्ण झाले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तळोघ अवचितवाडी (ता.इगतपुरी, जि.नाशिक) समृध्दी महामार्ग घोटी येथील उपमार्गाची (अंडरबायपास) रुंदी वाढविण्याबाबत**

**(१५) ५३२७६ (१८-०१-२०२३). श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तळोघ अवचितवाडी (ता.इगतपुरी, जि.नाशिक) समृध्दी महामार्ग घोटी येथील पोल नंबर ६१९/८८९ येथील उपमार्गाची (अंडरबायपास) रुंदी वाढविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे लेखी निवेदन केले आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, त्यांचे स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दादाजी भुसे (२५-०९-२०२३) :** (१) असे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.
(२) तथापि, तळोघ अवचितवाडी ता. इगतपूरी, जि. नाशिक समृध्दी महामार्गावर ६१९/८८९ मध्ये जुन पायवाट / गाडीवाट असल्याने त्या ठिकाणी P.U.P (Pedestrian Under Pass – पादचारी भुयारी मार्ग) ची तरतूद केली असून त्याची साईज ७m X ३m आहे व तो शेतकऱ्यांना येण्या-जाण्यासाठी उपयोगी आहे. सदर P.U.P चे काम Plan & Profile प्रमाणे मंजूर आराखड्यानुसार या पूर्वीच पूर्ण झालेले आहे. त्यामुळे पुलाची (P.U.P) रुंदी वाढविणे सदय:स्थितीत शक्य नाही.
तसेच, समृध्दी महामार्गाच्या तळोघ अवचितवाडी परिसरातील शेतकऱ्यांना वापरण्यासाठी सर्व्हिस रस्त्यांची वाढीव तरतूद प्रस्तावित करण्यात आली असून तळोशी अवचितवाडी रस्त्यावर समृध्दी महामार्ग साक्र. ६२०/४८० मधील L.V.U.P (Light Vehicular Under Pass Size १०.५० मी. X ३.५० मी.) यांना ५९१ मी. प्रस्तावित सर्व्हिस रोडने जोडण्यात येईल. व या किमी ६२०/४८० येथील अंडरपास (LVUP) मधून ही स्थानिक शेतकऱ्यांना जाण्या-येण्याची सुविधा उपलब्ध होईल.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## जाफ्राबाद (जि.जालना) तालुक्यातील जवखेडा ठेंग शिवारातील केणा नदीवर असलेला कोल्हापूरी सिमेंट बंधारा अतिवृष्टीत वाहून गेल्याबाबत

**(१६) ५३७१३ (१८-०१-२०२३). श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जाफ्राबाद (जि.जालना) तालुक्यातील जवखेडा ठेंग शिवारातील केणा नदीवर असलेला कोल्हापूरी सिमेंट बंधारा दोन वर्षांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीत वाहून गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त बंधारा दुरुस्त व्हावा व शेतकऱ्यांना सिंचानाकरीता पाणी मिळावे यासाठी सदर भागातील शेतकरी गेल्या दोन वर्षापासून जिल्हा परिषद सिंचन विभागाकडे पाठपुरावा करित असूनही प्रशासकीय दिरंगाईमुळे या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीला अद्याप सुरुवात झाली नसल्याची बाब माहे नोव्हेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने सदर बंधाऱ्याच्या दुरुस्तीचे काम तातडीने पुर्ण करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (११-०८-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.

कोल्हापुरी पध्दती बंधारा जवखेडा ठेंग ता.जाफ्राबाद या योजनेचे मूळ बांधकाम सुस्थितीत असून अतिवृष्टीमुळे डाव्या नदीतिराचे पार्श्ववहन (Out Flanking) झाले आहे.

(२) व (३) नाही.

कोल्हापूरी पध्दती बंधारा जवखेडा ठेंग ता.जाफ्राबाद या योजनेचा दुरुस्तीसाठी मा. मुख्यमंत्री जलसंवर्धन योजनांतर्गत आराखडयात समावेश करण्यात आला आहे. सदर योजनेची दुरुस्तीचे अंदाजपत्रक तयार करण्याचे काम विभागीय स्तरावर प्रगतीपथावर आहे. प्रस्तुत अंदाजपत्रकाच्या मंजुरी नंतर विषयांकित कोल्हापुरी पध्दतीच्या बंधाऱ्याच्या दुरुस्तीची कार्यवाही प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चेंबूर (मुंबई) येथील उद्यानाकरिता आरक्षित भूखंडावर अनधिकृतपणे भराव करुन गाडी पार्किंगचा व्यवसाय सुरु केल्याबाबत

**(१७) ५४९४४ (२७-०१-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चेंबूर (मुंबई) येथील न.भू.क्र. ५८६/३ एन.बी. पाटील मार्ग, घाटला गाव हा भूखंड आरक्षित उद्यानाकरिता राखीव आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भूखंडावर अनधिकृत भरणी करून गाड्या पार्किंगचा व्यवसाय सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांवर महानगरपलिका व शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-१०-२०२३) :** (१) बृहन्मुंबई विकास योजना-२०३४ नुसार न.भू.क्र.५८६/३अ व ५८६/३ब हे भूखंड (EOS१.४) खेळाचे मैदान या विद्यमान सुविधेने बाधित आहेत.

(२) हे खरे नाही.

सदर भुखंड महापालिकेमार्फत खेळाचे मैदान म्हणून विकसित करण्यात आला असून, सदर भूखंडाचे नामकरण कै.सुर्यकांत व्यंकटराव महाडिक क्रिडांगण असे करण्यात आलेले आहे. सदर भूखंडावर कोणत्याही प्रकारची अनधिकृत भरणी करुन गाडया पार्किंगचा व्यवसाय सुरु नसल्याबाबत महापालिकेने कळविले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) लागू नाही.

---

## अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रातील मूलभूत सोईसुविधाअंतर्गत विकास कामांना दिलेली स्थगिती उठविणेबाबत

**(१८) ५५०४६ (२७-०१-२०२३). श्री.संग्राम जगताप (अहमदनगर शहर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रातील मुलभूत सोईसुविधाअंतर्गत विकास कामांना शासनाने (नगरविकास विभाग, नवि-१६) रुपये १० कोटीच्या रक्कमेस दिनांक ९ एप्रिल, २०२२ रोजी वा त्यासुमारास मंजुरी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकास कामांना निधी उपलब्ध करुन देण्याऐवजी शासनाने त्या कामांना दिनांक ६ जुलै, २०२२ रोजी स्थगिती दिली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जनतेच्या सोईसुविधांच्या दृष्टीने सदरची कामे तातडीने पुर्ण होऊन त्याचा जनतेला लाभ मिळणे गरजेचे असतांना सदर कामांना शासनाने दिलेली स्थगिती उठवून त्यासाठी निधी उपलब्ध देण्यात यावा, अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी त्यांचे दिनांक २२ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने दिलेली स्थगिती उठवून कामे सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली अथवा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०२३) :** (१) होय हे खरे आहे.

(२) होय  खरे आहे.

(३) होय हे खरे आहे.

(४) अहमदनगर महानगरपालिकेकरीता दि.११.०४.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या रु.१०.०० कोटीच्या कामांना दि.०६ जुलै, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेली तात्पुरती स्थगिती दि.२१ जुलै, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये उठविण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

## निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील जुन्या बंधाऱ्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१९) ५६५४३ (२७-०४-२०२३). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निफाड (जि.नाशिक) तालुक्यातील जुन्या बंधाऱ्याची दुरुस्ती करण्यास निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधीनी तत्कालीन जलसंधारण मंत्री यांचेकडे दिनांक ३० जानेवारी,२०२० रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार जवळपास ८० बंधाऱ्याची कामे शासनाकडे मंजुरीकरिता प्रस्तावित केलेली असून अद्यापही मंजुरी मिळालेली नाही , हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने सदरच्या कामांना शासनाने मंजुरी प्रदान करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (११-०८-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) नाही.
सदर बंधाऱ्यापैकी २० कामे लेखाशिर्ष २७०२-५६३४ सर्वसाधारण योजनांतर्गत पुर्ण करण्यात आली असून ९ कामे जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आली आहेत. तसेच उर्वरित कामे निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्यात येतील.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेच्या वतीने शहरात आकांक्षी स्वच्छतागृहे उभारण्याबाबत**

**(२०) ५६९०२ (२४-०४-२०२३). श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरामध्ये विविध ठिकाणी आकांक्षी स्वच्छतागृहे उभारण्याचा निर्णय पुणे महानगरपालिकेने घेतला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, एकूण किती व कोणत्या ठिकाणी ही स्वच्छतागृहे उभारण्यात येणार आहे आणि त्यासाठी एकूण किती खर्च अपेक्षित आहे,
(३) असल्यास, दिनांक १९ जानेवारी २०२३ अखेर ह्या नियोजित स्वच्छतागृहाच्या कामांची सद्यस्थिती काय आहे तसेच सदर कामे पुर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०२३) :** (१) होय.
(२) पुणे महापालिका हद्दीत एकूण १५ क्षेत्रीय कार्यालयाच्या अंतर्गत एकूण १५ ठिकाणी आकांक्षी स्वच्छतागृहे उभारण्यात येणार आहेत. एका आकांक्षी स्वच्छतागृहामध्ये ४ पुरूष + ४ स्त्री + १ दिव्यांग + १ ट्रांसजेन्डर अशी एकूण १० सीट्स आहेत. त्याचे पूर्वगणनपत्रक रू.३६,२८,९६२/- इतके आहे. याप्रमाणे एकूण १५ ठिकाणी उभारण्यात येणाऱ्या आकांक्षी शौचालयासाठी रू. ५,४४,३४,४३०/- इतका खर्च अपेक्षित आहे. स्वच्छ भारत मिशन २ अंतर्गत मे केंद्र शासन व मे महाराष्ट्र शासन यांचा रू.२,३३,६४,०००/- इतका निधी व पुणे महानगरपालिकेचा रू.३,१०,७०,४७५/- निधी असणार आहे.
(३) मे शासनाने दि.०६.०४.२०२३ रोजी स्टेट लेव्हल टेक्निकल कमिटी (SLTC) मध्ये १० ठिकाणच्या आकांक्षी स्वच्छतागृहास मान्यता दिली आहे व उर्वरित ०५ ठिकाणच्या आकांक्षी स्वच्छतागृहांच्या कामास दि. १७.०५.२०२३ रोजी कमिटीची मान्यता प्राप्त आहे. सर्व प्रशासकीय बाबीची पूर्तता करून नियोजित स्वच्छतागृहांच्या उभारण्याकरीता कार्यादेश देण्यात आले असल्याचे पूणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) स्वमालकीच्या बसेस बंद करून कंत्राटी बस मार्गवर सोडल्या जात असल्याबाबत**

**(२१) ५७५६० (२४-०४-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या (पीएमपी) स्वमालकीच्या बसेस बंद करून कंत्राटी बस मार्गवर सोडल्या जात असल्याची बाब माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कंत्राटी बसेस अधिकाधिक मार्गावर धावत असल्याने पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या प्रतिदिन उत्पन्नात घट झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे डिसेंबर, २०२२ दरम्यान पीएमपीच्या स्वमालकीच्या ५७० बसेसच्या बदल्यात कंत्राटी ९७८ बसेस मार्गावर असून यामध्ये अनियमितता आढळून येत असल्याने कंत्राटी बसेसच्या अनेक तक्रारी प्रवासी करत असतांना देखील संबंधित वाहतूक व्यवस्थापन अधिकारी जाणीवपूर्वक उक्त बाबीकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१०-२०२३) :** (१) नाही.

(२) नाही.

(३) व (४) माहे डिसेंबर, २०२२ मध्ये पीएमपीएमएल च्या स्वमालकीच्या ९९१ बसेसपैकी ६८९ बसेच चालविण्यात आल्या असून खाजगी पूरवठादारांच्या ११९० बसेसपैकी ९४५ बसेस चालविण्यात आल्या आहेत. प्राप्त झालेल्या तक्रारींची त्वरीत दाखल घेऊन निराकरण करण्यात येत असल्याचे पुणे महानगर परिवहन महामंडळाने कळविले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

---

**पुणे जिह्यातील महामार्गाच्या दोन्ही बाजूचे सर्व्हिस रस्ते अतिक्रमित झाल्याबाबत**

**(२२) ५७५७४ (२४-०४-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील कात्रज वंडरसिटी ते नवले पूल, खेड शिवापूर-नवीन कात्रज बोगदा पुढे स्वामी नारायण मंदिर, नवले पुल ते वारजे व चांदणी चौकापर्यंत महामार्गाच्या दोन्ही बाजूचे सर्व्हिस रस्ते अतिक्रमित झाले असल्याचे माहे डिसेंबर, २०२२ मध्ये वा त्यादरमयान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अतिक्रमण, अनधिकृत सुशोभीकरण व विद्युत फलकाच्या माध्यमातून सर्व्हिस रस्त्यांवर होत असलेल्या अतिक्रमणामुळे वाहतूक कोंडी होत असून, येथील वाहने महामार्गावर उलट दिशेने येत असल्याने अपघातांचे प्रमाणे वाढले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त अतिक्रमणे तात्काळ काढण्यासाठी राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून तातडीची कार्यवाही होत नसल्याने शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे अंशत: खरे आहे. तथापि सदर भागांमध्ये अनधिकृत बांधकामांवर पुणे महानगरपालिकेकडून वेळोवेळी कारवाई केली जाते.

(३) पुणे महानगरपालिका व राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाकडून सर्व्हिस रस्त्यावरील अतिक्रमणांवर संयुक्तरित्या कार्यवाही करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बृहन्मुंबई महानगर पालिकेतर्फे बांधण्यात आलेल्या मंडई पुनर्विकासाच्या सद्य:स्थितीबाबत**

**(२३) ५७९४४ (२४-०४-२०२३). श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अखत्यारितीत सुमारे १९५ मंडईची बांधकाम करण्यात आले असून त्या मंडईचा वापर फळे, भाजीपाला, मांस इत्यादीच्या विक्रीसाठी उपयोग केला जातो, परंतु काही मंडईमध्ये दारुचे गुत्ते देखील सुरू असल्याचे माहे जानेवारी व फेब्रुवारी, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान लेखापरीक्षण केले असता निदर्शनास येऊन मंडईंच्या पुनर्विकासाचा प्रश्न गंभीर बनला असल्याचे मत `भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक' यांनी नोंदविले आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे पुनर्विकासासाठी घेतलेल्या ३० मंडईपैकी २३ मंडई अभिलेख्यांची `भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक' यांनी तपासणी केली असता केवळ ५ मंडईंचा पुनर्विकास करण्यात आला, तर १८ मंडई पुनर्विकासापासून वंचित राहिल्या आहेत, त्याबाबतच्या सद्यःस्थितीचा तपशील काय आहे,
(३) असल्यास, बहुसंख्य मंडईमध्ये अधिकारी व व्यापाऱ्यांच्या संगनमताने अनधिकृतपणे वापर करून महानगरपालिकेचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान झाले असल्याने उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी करून जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती प्रशासकीय वा दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०२३) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाजार विभागाकडे आजमितीपर्यंत समायोजन आरक्षणांतर्गत प्राप्त झालेल्या १०५ मंड्या असून, ९२ विद्यमान किरकोळ मंड्या आहेत.

समायोजन आरक्षणांतर्गत प्राप्त मंड्यांमध्ये महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांमध्ये बाधीत व्यक्तींना पर्यायी जागा देण्यात येतात.

पवई येथील समायोजन आरक्षणांतर्गत प्राप्त कोपरी व्हिलेज या नावाने अस्तित्वात मंडईमधील बिअर बारमध्ये मद्य विक्री होत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर सदर बिअर बारच्या अनुज्ञापत्रधारकाचे अनुज्ञापत्र / करार रद्द करण्यात आले आहे. तथापि अनुज्ञापत्रधारकाने त्यास मा. शहर व दिवाणी न्यायालय, मुंबई येथे याचिका क्रमांक १८१/२०१८ नुसार आव्हान दिले असून, सदर प्रकरणी मा. न्यायालयाने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करुन पुढील कार्यवाही करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार महानगरपालिकेच्या विधी विभागाच्या सल्ल्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

वांद्रे येथील आचार्य आत्माराम भाऊ लाड म्युनिसिपल मार्केट (खार मार्केट) मध्ये सुरु असलेल्या दारुच्या दुकानाचा परवाना जिल्हाधिकारी यांचेकडून रद्द करण्यात आला असून, सदर दुकान सध्या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. तसेच, दत्ताजी साळवी मंडईमधील दारुचे दुकान बंद करण्यात आले आहे.

दारुच्या दुकानांमुळे मंड्यांचा पुनर्विकास प्रश्न गंभीर बनला असल्याचे मत भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी नोंदविले आहे हे खरे नाही.

(२) राज्य शासनाच्या सन २००४-०५ च्या धोरणानुसार मंडई असोसिएशनमार्फत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या एकूण २० मंड्यांचा पुनर्विकास हाती घेतला असून त्यातील ६ मंडईंचा पुनर्विकास पूर्ण झाला आहे व तेथे बाजार विभागाच्या परवानाधारकांना पुनर्स्थापित केले आहे. तसेच ४ मंडईंचे खाजगी विकासकामार्फत पुनर्विकास कार्य सुरु असून त्यातील पुनर्वसन भागाचे बांधकाम पूर्ण झाले आहे. सद्य:स्थितीत वरील मजल्याचे काम प्रगतीपथावर असून त्यास भोगवटा

प्रमाणपत्र (भाग) प्राप्त झाल्यानंतर त्यामध्ये अनुज्ञापत्रधारकांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे. तसेच राज्य शासनाच्या दिनांक ०१.०४.२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार सदर मंड्यांना नव्याने सुधारीत इरादापत्र देण्याची प्रक्रिया सुरु आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या जुन्या मंड्यांच्या ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत नवीन बांधकाम हाती घेण्यात आले असून ४ मंड्यांची कामे प्रगतीपथावर आहेत व १७ मंड्यांची कामे प्रस्तावित आहेत. तसेच ज्या मंड्यांची दुरुस्ती आवश्यक आहे तेथे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत दुरुस्ती करण्यात येत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यस्तरावर अनुसूचित जाती व जमातीच्या प्रश्नांसाठी स्वतंत्र आयोग गठीत करण्याबाबत

**(२४) ५८०६१ (२६-०४-२०२३). श्री.राजेश एकडे (मलकापूर), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र शासनाच्या स्तरावर अनुसूचित जातीच्या प्रश्नांसाठी राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाप्रमाणे राज्यातही अनुसूचित जाती व जमातींच्या अन्याय व अत्याचारांचे निरासन होण्याच्या दृष्टीने स्वतंत्र आयोग गठीत करण्याबाबत शासनाला संघटनेव्दारे निवेदन देण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने सदर निवेदनावर विचार करून स्वतंत्र आयोगाची निर्मिती करण्याबाबत शासनस्तरावरून धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२३) :** (१) हे खरे आहे.

राज्यात स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्याबाबत आदिवासी विकास विभागाकडे लोकप्रतिनिधीकडून निवेदने प्राप्त झाली आहेत.

(२) व (३) राज्यात स्वतंत्र अनुसूचित जमाती आयोग स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

---

### विमानतळ प्राधिकरणाच्या अतर्गत फनेल झोनमध्ये असलेल्या इमारतीच्या पुनर्विकासाबाबत

**(२५) ५८१२३ (२४-०४-२०२३). श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई उपनगरातील विलेपार्ले, सांताक्रूझ आणि कुर्ला या परिसरातील सिंधी कॉलनी, वाडिया इस्टेट वसाहत, बैल बाजार येथील शासकीय मालकीच्या ७० वर्षे जुन्या विमानतळ प्राधिकरणाच्या फनेल क्षेत्रातील ४०० हून अधिक इमारतीच्या पुनर्विकासाचा प्रस्ताव शासनाकडे सन २०१६ पासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतींच्या पुनर्विकासासाठी स्वतंत्र नियमावली करण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या वतीने एक समिती स्थापन केली असून, सदर समितीने आपला अहवाल सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अहवालानुसार संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अभिप्राय मागविण्यात आले असून, सदरहू अभिप्राय प्राप्त झाले आहेत काय,

(४) असल्यास, उक्त अभिप्रायाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-१०-२०२३) :** (१), (२), (३) व (४) बृहन्मुंबईमधील छत्रपती शिवाजी महाराज विमानतळावरील विमानांच्या उड्डाणाच्या सुरक्षेकरिता एअरपोर्ट फ़नेल झोन मधील इमारतींवर उंचीचे निर्बंध घालण्यात आले असल्याने सदरहू क्षेत्रातील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासात (बेसिक + प्रिमियम एफ़एसआय + टिडीआर) परवानगीयोग्य संपुर्ण क्षेत्राचा वापर करणे शक्य होत नाही, ही वस्तुस्थिती आहे.

विमानतळ परिसरातील एअरपोर्ट फ़नेल झोन मधील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासंबंधी अभ्यास करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने समिती गठीत केली होती. सदर अभ्यास समितीने केलेल्या शिफ़ारशींच्या अनुषंगाने एअरपोर्ट फ़नेल झोन मधील जुन्या इमारतींच्या पुनर्विकासंबंधी बृहन्मुंबई महानगरपालिकेने दि.०९/०९/२०२१ रोजीचे पत्राद्वारे शासनास प्रस्ताव सादर केला आहे. महापालिकेच्या सदरहू प्रस्तावाचे अनुषंगाने संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दि.३०/१२/२०२१ रोजीचे पत्राद्वारे अभिप्राय/अहवाल प्राप्त झाले असून त्यामध्ये महापालिकेने सादर केलेला प्रस्ताव उचित नसल्याबाबत कळविले आहे. तसेच, महापालिकेचा प्रस्ताव व संचालक, नगररचना यांनी अभिप्रायामध्ये पुनर्विकासाबाबत सुचविलेला पर्याय यामध्ये एकवाक्यता नसून एक विशिष्ट प्रस्ताव स्विकारावा अशी बाब नाही.

तथापि, बृहन्मुंबई क्षेत्रातील उंचीचे निर्बंध असलेल्या एअरपोर्ट फनेल झोन मधील जुन्या इमारतींचा पुनर्विकास सुसह्य व्हावा याकरिता नियमावलीमध्ये विशिष्ट तरतूद करणे तसेच अशा प्रकारे इतर निर्बंध असल्यामुळे पुनर्विकासास अडथळा येत असलेल्या क्षेत्राचा पुनर्विकास करणे शक्य होण्याकरिता बृहन्मुंबई विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली-२०३४ मध्ये स्वतंत्र तरतूद अंतर्भूत करणेची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.
(५) लागू नाही.

---

## मुंबई महानगरपालिकेतील बी.एड्. (फिजीकल) शिक्षकांच्या वेतन श्रेणीबाबत

**(२६) ५८९७२ (२१-०४-२०२३). श्री.अतुल बेनके (जुन्नर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या A ते T प्रभागातील महापालिकेच्या शाळांमधील प्राथमिक शिक्षण विभागात कार्यरत बी.एड्. फिजीकल असणाऱ्या ३१७ शिक्षकांना सन २००० पासून आतापर्यंत डी.एड्. या कमी वेतनश्रेणीवर काम करावे लागत असल्याची बाब दिनांक १५ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य शासन तथा महानगरपालिकेने बी.एड्. (फिजीकल) ही शिक्षकांची पदवी बी.एड्. समकक्ष असताना देखील सदरहू ३१७ शिक्षकांना गेली २२ वर्षे डी.एड्. या कमी वेतन श्रेणीवर ठेवून कमी वेतन देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त अन्यायग्रस्त शिक्षकांनी शासन तथा महापालिका आयुक्तांना २००८ पासून ते आजपर्यंत अनेक वेळा लेखी निवेदन देऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, सदरहू प्रकरणी दरमहा १००० ते १५०० रुपये इतके गेली २२ वर्षापासून बी.एड्. शिक्षक असलेल्या शिक्षकांवर झालेला अन्याय विचारात घेता सदरहू शिक्षकांना तात्काळ बी.एड्. वेतन श्रेणीनुसार वेतन मंजूर करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०२३) :** (१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील इयत्ता ५ वी ते ७ वी चे वर्ग शिकविणाऱ्या बी.एड पदवीधर शिक्षकांपैकी २५% शिक्षकांना शासनाच्या धोरणाप्रमाणे सहाव्या वेतन आयोगानुसार बी.एड वेतनश्रेणी लागू करण्यात आली आहे. तथापि शारिरीक शिक्षण शिक्षक हे इयत्ता ५ वी ते ७ वी च्या वर्गावर अध्यापनाचे कार्य करत नसल्यामुळे त्यांना बी.एड वेतनश्रेणी लागू करण्याबाबत शासनाचे कोणतेही धोरण नाही.

(२) व (३) बृहन्मुंबई महानगरपालिकेतील प्रशिक्षित शिक्षक व विशेष शिक्षकांना शासनाच्या धर्तीवर सहाव्या वेतन आयोगानुसार त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करण्यात आली असून, संबंधित शारिरीक शिक्षण शिक्षकांनाही त्रिस्तरीय वेतनश्रेणीनुसार वेतन आकारण्यात आले आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे बाळेवाडी (ता.आष्टी, जि.बीड) येथील नदीवर पुल वजा बंधारा बांधण्याबाबत**

**(२७) ५९८३७ (०९-०५-२०२३). श्री.बाळासाहेब आजबे (आष्टी) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे बाळेवाडी (ता.आष्टी, जि.बीड) येथून मेटकरी नदी वाहत असून माहे जून ते जानेवारी-फेब्रुवारी या काळात दरवर्षी मोठ्या प्रमाणात पाणी वाहते तसेच नदीच्या पश्चिमेकडील भागात अर्ध्याहून अधिक लोकसंख्या असून गाव मात्र पूर्व भागात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पश्चिम भागातील लोकांचा गावाशी संपर्क तुटला असल्याने विद्यार्थी-मुले व नागरिकांना ये-जा करण्यासाठी तेथील कुबेफळ, धानोरा याठिकाणी जाण्यास सहा ते सात किलोमीटर अंतर पार करावे लागत असल्याचे दिनांक २३ जानेवारी, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू शालेय विद्यार्थी व ग्रामस्थांना होणारा त्रास कमी करण्यासाठी बाळेवाडी गावांत नदीवर पुल वजा बंधारा बांधण्यात यावा, अशी मागणी तेथील ग्रामस्थ नागरिक व स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार शासनाकडे केली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने सदर नदीवर पूल वजा बंधारा बांधून नागरिकांचा त्रास कमी करण्याबाबत तसेच पाण्याचा प्रश्न मार्गी लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय राठोड (११-०९-२०२३) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) होय, हे अंशत: खरे आहे
मा. स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी उपविभागीय जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण उपविभाग, आष्टी जि.बीड यांचेकडे तोंडी मागणी करण्यात आलेली आहे.
(४) सदर कामांच्या सर्वेक्षणाचे काम मृद व जलसंधारण विभाग, बीड यांचे मार्फत हाती घेण्यात आले असून सर्वेक्षणाअंती योजनेची व्यवहार्यता तपासून अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ब्रम्हपूरी नगरपरिषद, सिंदेवाही व सावली नगरपंचायतीला वैशिष्टपुर्ण योजना, नाविण्यपुर्ण योजनेसह विकास कामांना देण्यात आलेली स्थगिती उठविण्याबाबत**

**(२८) ६०३५८ (११-०५-२०२३). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील ब्रम्हपूरी नगरपरिषद, सिंदेवाही व सावली नगरपंचायतीला वैशिष्टपुर्ण योजना, नाविन्यपुर्ण योजनेसह विविध योजने अंतर्गत सन २०२१ ते माहे जुन, २०२२ पर्यत विविध विकास कामांना मंजूरी देण्यात आलेली असून या सर्व कामांना सदर नगरपरिषद / नगरपंचायत व कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नागभिड, जिल्हा चंद्रपूर वतीने उपरोक्त कामांचे प्रस्ताव, अंदाजपत्रक, निविदा तयार करण्याची प्रक्रिया सूरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कामांच्या अंदाजपत्रक तयार करणे व निविदा प्रक्रिया सुरु असतानाच सदर प्रक्रियांना स्थगिती देण्यात आली असून स्थगितीमुळे सदर कामांच्या प्रगतीवर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त कामांची तातडी आणि आवश्यकता लक्षात घेता दिलेली स्थगिती तात्काळ उठवून कामे तात्काळ पुन्हा सुरु करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०२३) :** (१), (२), (३) व (४) ब्रम्हपूरी नगरपरिषद, सिंदेवाही नगरपंचायत व सावली नगरपंचायत करीता दि. २१.०२.२०२२ रोजीच्या शासन निर्णान्वये मंजूर केलेल्या अनुक्रमे रु.३.०० कोटी, रु.३.०० कोटी व रु.२.०० कोटीच्या कामांना दि.६ जुलै, २०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये दिलेली तात्पुरती स्थगिती दि.१७ ऑगस्ट, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये उठविण्यात आली आहे.

---

## ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ महानगरपालिकेतील पथदिव्यांची सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदारावर कारवाई करून पथदिवे सुरू करण्याबाबत

**(२९) ६१०१८ (२४-०४-२०२३). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ महानगरपालिकेतील पथदिव्यांची सेवा पुरविणाऱ्या कंत्राटदाराला दरमहा लाखो रुपये देयके अदा करीत असतांनाही अंबरनाथ शहरांतर्गत तसेच कल्याण-बदलापूर महामार्गावरील बहुतांशी पथदिवे गेल्या कांही दिवसांपासून बंद अवस्थेत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, अंबरनाथ शहरांतर्गत तसेच कल्याण-बदलापूर महामार्गावरील पथदिव्यांच्या देखभाल दुरुस्तीचे कंत्राट देण्यात आलेल्या ठेकेदारावर कारवाई करून पथदिवे सुरू करण्याबाबत कोणती कार्यवाही केली व करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०९-२०२३) :** (१), (२) व (३) कल्याण-बदलापूर रस्ता हा राज्य महामार्ग असून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत आहे. सदर रस्त्याचे रूंदीकरण व काँक्रीटीकरण करुन पथदिवे बसविण्याचे काम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांचेमार्फत करण्यात आलेले आहे. पथदिवे हस्तांतरण करण्यापूर्वी सदर ठिकाणी विज मीटर कनेक्शन घेण्याबाबत मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने नगरपरिषदेस कळविले होते. त्यानुसार नगरपरिषदेने आवश्यक रकमेचा भरणा महाराष्ट्र राज्य विद्युत महामंडळाकडे करुन विज कनेक्शन घेतले आहे. सद्य:स्थितीत पथदिव्यांची देखभाल व दुरुस्ती मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत करण्यात येत असून प्रकल्पाचे हस्तांतरण नगरपरिषदेस करण्याचे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चेंबूर (मुंबई) येथील भूखंडाचे मनोरंजन व मैदानासाठी असलेले आरक्षण बदलण्याचा निर्णय महापालिकेने घेतल्याबाबत

**(३०) ६१३२० (२४-०४-२०२३). श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चेंबूर (मुंबई) येथील भूखंडाचे मनोरंजन व मैदानासाठी असलेले आरक्षण बदलण्याचा निर्णय महानगरपालिकेने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या नियोजन व नगररचना विभागाच्या प्रस्तावानंतर सदर भूखंडावर क्लब आणि जिमखाना बांधण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यासाठी महानगरपालिकेमार्फत नागरीकांकडून सूचना व हरकती मागविण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, त्यानुषंगाने आतापर्यंत किती सूचना व हरकती प्राप्त झाल्या आहेत व उक्त प्रस्तावाच्या अंमलबजावणीची सद्यःस्थिती काय आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१४-०९-२०२३) :** (१), (२) व (३) हे भागशः खरे आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेने सदर जागेवरील मनोरंजन मैदानाचे (DOS २.६) नामनिर्देशन वगळून क्लब/जिमखाना (DOS २.१) चे नामनिर्देशन दर्शविण्याबाबत फ़ेरबदल प्रस्तावित केला आहे.
(४) सदर फ़ेरबदल प्रस्तावाच्या अनुषंगाने बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे ४ हरकत/सूचना प्राप्त झाल्या असून सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने महापालिका स्तरावर महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कमल ३७(१) नुसार कार्यवाही करण्यात येत असल्याचे बृहन्मुंबई महानगर पालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर शहरातील केशवराव भोसले नाट्यगृहाची दुरुस्ती करण्याबाबत

**(३१) ६१३९६ (२०-०४-२०२३). श्रीमती जयश्री जाधव (कोल्हापूर उत्तर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूरला ऐतिहासिक वारसा असून नाट्य व चित्रपट रंगमंच यांचा जन्म या नगरीत झाला असून सदर ठिकाणी शाहू महाराजाच्या काळातील ऐतिहासिक उत्तम वास्तु कलाकृतीचा नमुना असणारे केशवराव भोसले नाट्यगृह यास सुमारे ११२ वर्षापेक्षाही जास्त कालावधी झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त ठिकाणी सदर नाट्यगृहात आजतागायत विविध नाटके व विविध सांस्कृतिक कार्यक्रम नियमाने सुरू असून सदर ठिकाणी अत्याधुनिक सोयीसुविधा असणे गरजेचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शाहूकालीन काळातील या नाट्यगृहाचे संवर्धन व जतन करणे शासनाचे कर्तव्य असल्याने उपरोक्त ठिकाणी प्रशासकीय व सोयीसुविधायुक्त प्रशस्त असे भव्य नाट्यगृह उभारावे अशीही मागणी नाट्यरसिक, कलावंत तसेच कलाप्रेमी यांच्यामधून अनेकदा करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. एकनाथ शिंदे (२१-०९-२०२३) :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) केशवराव भोसले नाटयगृह ही वास्तु ऐतिहासिक असल्याने नुतणीकरण तसेच अत्याधुनिक सोईसुविधा तसेच बैठक व्यवस्थेची क्षमता वाढविण्यास मर्यादा पडतात. तसेच सदर नाटयगृह शहराच्या मध्यवर्ती भागामध्ये असल्याने पार्किंगसाठी मर्यादा येते.
कोल्हापूर शहरामध्ये अत्याधुनिक सोई-सुविधायुक्त प्रशस्त असे भव्य नाटयगृह उभारावे अशी मागणी रंगकर्मी, नाटयप्रेमी, प्रेक्षक यांचेकडून होत असल्याने कोल्हापूर महानगरपालिकेमार्फत शासकीय विश्रामगृह परिसरातील स.नं.२०६/८९ या जागेवर सुसज्ज व प्रशस्त असे नविन नाटयगृह बांधण्याचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडे सादर करण्यात आला आहे. सदर प्रस्तावास मान्यता प्राप्त झाल्यानंतर यासंदर्भातील पुढील कार्यवाही करण्याचे महानगरपालिकेचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## विटा (जि.सांगली) येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय होण्याबाबत

**(३२) ६३०५५ (२५-०४-२०२३). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विटा (जि.सांगली) येथे उपप्रादेशिक परिवहन कार्यालय होण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीने मागणी केल्याचे माहे जानेवारी, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कार्यालयास मंजुरी देण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार विटा येथे उप प्रादेशिक परिवहन कार्यालय होण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-१०-२०२३) :** (१) होय.

(२) व (३) महाराष्ट्र राज्यात नवीन प्रादेशिक परिवहन कार्यालय सुरु करण्याबाबचे धोरण / निकष गृह (परिवहन) विभाग, शासन निर्णय क्र. एमव्हीडी-०८१५/प्र.क्र.२२३/परि-४, दि. १८.०६. २०१८ अन्वये ठरविण्यात आलेले आहे.

राज्यात एखाद्या जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन जिल्हा निर्माण झाला असेल तर, नवीन जिल्ह्याच्या कार्यक्षेत्रामध्ये नवीन परिवहन कार्यालयाची स्थापना करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. या शासन धोरणानुसार सद्यस्थितीत विटा, ता. खानापूर येथे नवीन परिवहन कार्यालय निर्माण करता येणार नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बऱ्हाणपूर (ता. मोर्शी जि.अमरावती ) येथील ढवळी नदीचे खोलीकरण व रुंदीकरणास निधीसह मंजूरी मिळण्याबाबत

**(३३) ६३३८० (२५-०४-२०२३). ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बऱ्हाणपूर (ता.मोर्शी जि.अमरावती) येथील ढवळी नदीचे खोलीकरण व रुंदीकरण करण्याकरीता निधीसह मंजूरी मिळण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधीनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक १७ ऑगस्ट, २०२२ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार ढवळी नदीचे खोलीकरण व रुंदीकरणास निधीसह मंजूरी मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत

**श्री. संजय राठोड (११-०८-२०२३) :**

(१) होय, हे खरे आहे.

(२) ब-हाणपूर ता. मोर्शी येथील ढवळी नदीवर २ साठवण बंधारे व बंधा-याचे मागील खोलीकरण घेण्यात आलेले असून सदर कामास जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद यांचे प्र.मा. आदेश क्र. ५९९६/९४६, दि. ०९.०५.२०२२ अन्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून सदर कामे निविदा कार्यवाहीत असून सद्यस्थिती निविदा उठविण्याबाबत विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## भुसावळ शहरातील टिंबर मार्केट येथील मुन्सिपल घर क्रमांक ४/३४८ मिळकत नगरपालिकेच्या ताब्यात घेण्याबाबत

**(३४) ६४५५७ (०५-०६-२०२३). श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ शहरातील टिंबल मार्केट येथील मुन्सिपल घर क्रमांक ४/३४७ ही मिळकत नगरपालिकेच्या अखत्यारित येत असून नगरपालिकेने सदर जागा तातडीने ताब्यात घेण्याबाबतची तक्रार श्री.दिनेश उपाध्याय यांनी दिनांक १३ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनाकडे केली असून, त्यानुषंगाने विभागीय कार्यालय, नाशिक यांनी दिनांक २२ सप्टेंबर, २०२१ रोजी जिल्हाधिकारी, जळगांव यांना उक्त प्रकरणी कारवाई करण्याबाबत पत्र अग्रेषित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू प्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयाने आजमितीसपर्यंत उक्त पत्राच्या अनुषंगाने कोणतीही कारवाई केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू जागा ताब्यात न घेणाऱ्या नगरपालिका प्रशासनातील संबधित अधिकारी / कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच जागा ताब्यात घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२६-०९-२०२३) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) जिल्हाधिकारी, जळगाव यांच्या दि. १७ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त सुचनांनुसार मुख्याधिकारी, भुसावळ नगरपरिषद यांनी सदर प्रकरणी चौकशी केली आहे. यानुसार म्युनिसिपल घर क्र.४/३४७ या मिळकतीच्या विभागणीची नोंद वेगळया हस्ताक्षरात चुकीच्या ठिकाणी चुकीच्या पद्धतीने अभिलेखावर घेण्यात आल्याचे निदर्शनास आले. सदर अभिलेखावर केलेले बदल हे प्रभारी लिपिक यांच्या कार्यकाळात झाल्याचे प्रथमदर्शनी दिसून आले. त्यामुळे त्यांचा प्रभारी लिपिक पदाचा कार्यभार काढून त्यांच्या सेवापुस्तकात महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम १९७९ मधील कलम ५ (१) नुसार ठपका ठेवण्याची कार्यवाही करण्यात आली.

सदर चौकशी अहवालानुसार म्युनिसिपल घर क्र. ४/३४७ या मिळकतीची चुकीच्या पद्धतीने झालेली विभागणी रद्दबातल करुन, श्रीमती वाघचौरे यांचे नाव नगरपरिषदेच्या डाटा व असेसमेंट नोंदवहीमधून कमी करण्यात आले आहे. सद्य:स्थितीत सदर जागा भुसावळ नगरपरिषदेच्या ताब्यात आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## वसई-विरार (जि.पालघर) महानगरपालिकेने एकही शाळा स्थापन केली नसल्याबाबत

**(३५) ६४५७२ (२३-०८-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा), श्री.चेतन तुपे (हडपसर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वसई-विरार महानगरपालिकेची स्थापना सन २००९ मध्ये झाली, त्यानंतर १३ वर्षानंतर देखील महानगरपालिकेने एक ही शाळा दिनांक ८ एप्रिल, २०२३ रोजीपर्यंत स्थापन केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्राथमिक शिक्षण उपलब्ध करून देणे ही महानगरपालिकेची जबाबदारी असताना, शिक्षण कराच्या रूपात आतापर्यंत १६५ कोटी रूपये वसूल केले असताना व विकास आराखडयात ६८ भुखंड आरक्षित असताना देखील शाळा स्थापन करण्यात आलेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व तदनुसार शाळाची स्थापना करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) तसेच निधी व जागा उपलब्ध असताना नियोजन शुन्य कारभार करणाऱ्या व खाजगी शाळाचे हितसंबंध जपणाऱ्या नियोजन अधिकाऱ्यांविरूध्द शासनाने कोणती शिस्तभंगाची कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-१०-२०२३) :** (१) वसई-विरार शहर महानगरपालिकेचे शिक्षण मंडळ अस्तित्वात नसल्याने व शिक्षण धोरण निश्चित नसल्यामुळे महानगरपालिकेच्या मालकीची शाळा अस्तित्वात नाही, ही वस्तुस्थिती आहे.
(२), (३) व (४) शिक्षण कर हा राज्य शासनाचा कर असून महानगरपालिका सदरचा कर गोळा करत असल्याने वसई-विरार शहर महानगरपालिकेमार्फत उपरोक्त करापोटी आतापर्यंत वसुल केलेली रक्कम रुपये १६७.५१ कोटी शासनास अदा केल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
तसेच वसई विरार उपप्रदेशाचे मंजुर विकास आराखड्यामध्ये एकूण १५३ भूखंड प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी आरक्षित आहेत.
वसई विरार शहर महानगरपालिकेचे शिक्षण धोरण निश्चित झाल्यावर त्यानुसार शिक्षण मंडळ स्थापन करणे, शाळा उभारणे इ. शैक्षणिक कामे करण्याबाबतची तजविज ठेवल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे शहरातील घोडबंदर परिसरासह शहरातील पाणीटंचाई दुर करण्यासंदर्भात उपाययोजना करणेबाबत**

**(३६) ६४६०९ (२४-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे शहरातील घोडबंदर परिसरातील गृहसंकुलांना भेडसावणारी पाणीटंचाई लवकरात लवकर दूर न केल्यास मोर्चा काढून तीव्र आंदोलन करण्याचा इशारा स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी तसेच वारंवार आयुक्त, ठाणे महानगरपालिका व प्रशासनास दिलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार घोडबंदर परिसरासह ठाणे शहरातील पाणीटंचाई दुर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील हिरानंदानी इस्टेट गृह संकुलातील जुन्या १५ इमारतींना पाणीपुरवठा कमी प्रमाणात होत होता. यासाठी सदर इमारतींची मिटर तपासणी करणे, कनेक्शन तपासणी करणे, आवश्यक त्या ठिकाणी वाढीव संयोजने देणे ही कामे करुन या इमारतींना योग्य प्रमाणात पाणी पुरवठा करण्यात येत असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्ह्यातील दिघा धरण महापालिकेकडे हस्तांतरित करुन**
**पाणीटंचाईची समस्या दूर करण्याबाबत**

**(३७) ६४७१० (३१-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अनिल देशमुख (काटोल), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील कळवा आणि ऐरोलीच्या मध्यभागी असणाऱ्या दिघा येथील धरण ठाणे महापालिकेकडे हस्तांतरित करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे निवेदनाव्दारे दिनांक २१ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास वारंवार मागणी केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू धरण महापालिकेस हस्तांतरीत केल्यास महापालिका क्षेत्रातील पाणीटंचाई काही अंशी दूर होऊ शकते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केलेली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने पाणीटंचाई दूर करण्याबाबत सदर धरण हस्तांतरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-१०-२०२३) :** (१), (२) व (३) ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील पाणी टंचाई दुर करण्याच्या दृष्टिने कळवा व ऐरोलीच्या मध्यभागी दिघा येथील धरण ठाणे महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यासंदर्भात सन २०२३ च्या पावसाळी अधिवेशनात विधानमंडळ आयुध उपस्थित करण्यात आले होते.

सदरचे धरण दिघा एलटन पाडा येथे असून रेल्वे विभागाच्या मालकीचे असल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे.

सदर प्रकरणाच्या अनुषंगाने उपरोक्त धरणातून आवश्यकते नुसार पाणी उपलब्ध करुन घेणे / त्याचा वापर / खर्च इ. बाबी तपासून त्यानुसार रेल्वे विभागाशी संर्पक करुन पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना आयुक्त, ठाणे महानगरपालिका यांना देण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवी मुंबईतील वंडर्स पार्क येथे झालेल्या अपघाताबाबत**

**(३८) ६५०७४ (२८-०८-२०२३). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नेरूळ (नवी मुंबई) येथील वंडर पार्कमध्ये नव्याने बसविण्यात आलेल्या स्काय स्विंगर राईड तुटून झालेल्या अपघातात एकाच कुटूंबातील तीन व्यक्ती गंभीर जखमी तसेच अन्य सहा व्यक्ती देखील जखमी झाल्या असल्याचे दिनांक ३ जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने जखमींना औषधोपचाराचा खर्च देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०६-१०-२०२३) :** (१) नेरूळ सेक्टर १९ए येथील वंडर्स पार्कमध्ये नव्याने बसविण्यात आलेल्या स्काय स्विंगर राईड्सचा वेग कमी न झाल्याने, सदर राईड्स लगतच्या रेलींगला घासत गेली. त्यामुळे राईड्समध्ये असलेल्या सहा पर्यटकांना किरकोळ दुखापत झाली, ही वस्तुस्थिती आहे.

(२) सदर प्रकरणी त्रयस्थ तांत्रिक चौकशी करणेकरिता आय.आय.टी. मुंबई यांची नियुक्ती करण्यात आलेली असून, चौकशी सुरू आहे.

(३) आय.आय.टी. मुंबई यांचेकडून चौकशी अहवाल प्राप्त झालेनंतर पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

सदर राईडच्या अपघातात जखमी झालेल्या सहा पर्यटकांना दि.०३.०६.२०२३ रोजी अपोलो हॉस्पीटलमध्ये प्राथमिक उपचार करून घरी सोडण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाबाबत चौकशी करण्याबाबत

**(३९) ६५१५१ (३१-०८-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील वसई-विरार महानगरपालिका क्षेत्रात अनधिकृत बांधकामे वाढत असून महानगरपालिका प्रशासन त्या विरोधात कोणतीच कारवाई करत नसल्याने अनधिकृत बांधकाम विभागाचे प्रमुख, श्री.अजित मुठे, सहाय्यक आयुक्त, श्रीमती नीता कोरे आणि अभियंता, श्री.कृतार्थ धानवे यांच्या विरोधात कामात हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवत चौकशी करून त्यांचे विरोधात फौजदारी गुन्हे दाखल करण्याबाबत लेखी पत्र विभागाने आयुक्त, श्री.अनिलकुमार पवार यांना दिनांक १४ मे, २०२३ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एच व जी प्रभाग समिती सोडून अन्य ठिकाणी उपायुक्त अजित मुठे यांनी अनधिकृत बांधकामाला सहकार्य करुन कारवाईमधून अनेक अनधिकृत बांधकामाला वगळण्याबाबतच्या अनेक गंभीर आरोप व तक्रारी असल्याने तसेच प्रभाग समिती ई. मधील १८ इमारतींवर कारवाई न केल्याबाबत गंभीर आरोपांची चौकशी करण्याबरोबरच त्यांना सहकार्य करणाऱ्या सहाय्यक आयुक्त, श्रीमती नीता कोरे, अभियंता, श्री.कृतार्थ धानवे यांच्या चौकशीचे आदेश दिल्यानुसार चौकशीचे काम आयुक्तांनी सुरू केले आहे काय,

(३) असल्यास, अनधिकृत बांधकामावर नियंत्रण मिळविल्या सोबतच बांधकामे पुन्हा उभी राहू नयेत म्हणून कायदेशीर कार्यालयीन प्रक्रिया पार पडण्याची जबाबदारी उपायुक्त श्री.अजित मुठे, प्रभागाचे सहाय्यक आयुक्त व त्या विभागाच्या कनिष्ठ अभियंत्यांवर असल्याने त्यांची चौकशी सुरु केली आहे, काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषीविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (०४-१०-२०२३) :** (१), (२), (३) व (४) अशा स्वरुपाची तक्रार वसई-विरार शहर महानगरपालिकेकडे प्राप्त झाली आहे, ही वस्तुस्थिती आहे.

तथापि, प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तपासणी करुन कारवाई करण्यात येत असल्याचे महानगरपालिकेने कळविले आहे.

राज्यातील नागरी क्षेत्रात अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निष्कासन व नियंत्रण करण्याच्या अनुषंगाने शासन स्तरावरुन दिनांक ०२.०३.२००९ च्या शासन निर्णयान्वये संपुर्ण कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. उपरोक्त मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.

तसेच वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामाच्या अनुषंगाने शासन स्तरावर प्राप्त होणाऱ्या सर्व तक्रारी वेळोवेळी आवश्यक त्या नियमोचित कार्यवाहीकरिता महानगरपालिकेस पाठविण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## शिवडी-न्हावाशेवा सागरी सेतुमुळे बाधित झालेल्या एलिफंटा बेटावरील पारंपारिक २७२ मच्छिमारांना नुकसान भरपाई मिळणेबाबत

**(४०) ६५१९३ (२८-०८-२०२३). डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील सर्वात मोठ्या लांबीच्या शिवडी-न्हावाशेवा सागरी सेतुमुळे बाधित जगप्रसिध्द एलिफंटा बेटावरील पारंपारिक २७२ मच्छिमारांना एमएमआरडीएने नुकसान भरपाईच्या यादीतून वगळलेले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी घारापुरी ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंचांनी मत्स्यस्वव्यवसाय तसेच एमएमआरडीए प्रशासनाकडे दिनांक ३१ मे, २०२३ रोजी तसेच वारंवार २७२ पारंपारिक मच्छिमारांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी मागण्यांचे निवेदन सादर केलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार पारंपारिक मच्छिमारांच्या न्याय मागण्यांवर त्वरेने निर्णय घेण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०९-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) मुंबई पारबंदर पुलाच्या बांधकामामुळे ज्या मच्छिमाराच्या व्यवसायावर परिणाम अश्या मच्छिमाराना नुकसान भरपाई देण्याबाबत धोरण निच्छित करण्यात आलेले आहे. नुकसान भरपाई देण्याकरीता मत्सव्यवसाय विभागाने ज्या मच्छिमाराना मासेमारी करण्याचा परवाना दिलेला आहे. अश्या मच्छिमाराना निश्चित केलेल्या धोरणानुसार नुकसान भरपाई देण्यात येते. घारापुरी गावातील २६१ लोकांनी नुकसान भरपाई मिळण्याकरीता अर्ज सादर केले होते. सदर प्राप्त अर्जामध्ये २२ अर्ज दुबार होते. सदर सादर केलेल्या अर्जासोबत मत्सव्यवसाय विभागाने दिलेले विधी ग्राह्य परवाना च्या आधारे १४ बाधित मच्छिमारांना बांधवाना नुकसान भरपाईसाठी पात्र ठरविण्यात आले असून त्यांना एकूण रु.४६.४० लक्ष इतके नुकसान भरपाईचे वाटप केलेले आहे उर्वरित २२५ अर्जदार नागरीकांनी विधीग्राह्य पुरावे सादर केले नसल्याने त्यांना सक्षम समितीने अपात्र ठरविलेले आहे. सदर अर्जदारांनी विधीग्राह्य पुरावे सादर केल्यास त्यांनासुध्दा नुकसान भरपाई करीता पात्र ठरवून नुकसान भरपाईची रक्कम अदा करण्यात येईल.

---

## पुणे महानगरपालिकेतील डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी आरोग्य विषयक योजना पुर्ववत सुरु करण्याबाबत

**(४१) ६५२९१ (२५-०८-२०२३). श्री.निलेश लंके (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गरीब, गरजू जेष्ठ रुग्णांसाठी आधारवड ठरणारी डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी आरोग्य विषयक योजना पुणे महानगरपालिकेने निधीची तरतूद नसल्याने बंद करावी असे पत्र सदर योजना चालवणाऱ्या एजन्सी ला दिनांक २३ एप्रिल, २०२३ रोजी वा त्या सुमारास दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रस्ना डायग्नोस्टिक सेंटर लिमिटेड मार्फत कोथरूड येथील सुतार दवाखाना व कमाल नेहरू रुग्णालय येथे ही योजना चालविली जात असून, सदर योजना दिनांक १ एप्रिल २०२३ पासून बंद करण्याबाबत निर्णय दिल्याने शेकडो रुग्णांना या योजनेपासून वंचित रहावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुणे महानगरपालिका व राज्य शासनाने त्यांच्या आर्थिक वर्ष २०२३-२४ च्या अंदाजपत्रकामध्ये या योजने करीता किती निधीची तरतूद केली होती, त्यातून पूर्ण खर्च न करण्याची कारणे काय, सदर तरतूद अंदाजपत्रकात न करण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(४) तसेच भविष्यात या योजनेकरिता तातडीने निधी उपलब्ध करुन सदरहू योजना पुर्वव्रत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१०-२०२३) :** (१) हे अंशत: खरे आहे. तथापि सदरचे पत्र दि.१०.०४.२०२३ रोजी देण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही. शहरी गरीब योजना हि सद्यस्थितीत पुणे शहरातील सर्व गरजू, गरीब व जेष्ठ नागरीकांसाठी सुरू असून त्याचा लाभ देण्यात येत आहे. तसेच मे. एचएलएल लाईफ केअर लि. या संस्थेमार्फत सर्व तपासण्या मोफत करण्यात येणार असल्याने रूग्नांना या योजनेपासून वंचित रहावे लागणार नाही.
(३) सार्वजनिक आरोग्य विभागाने दि.१६.०९.२०२२ रोजीच्या पत्रान्वये मे. एचएलएल लाईफ केअर लि. या संस्थेमार्फत सर्व तपासण्या मोफत करण्यात येणार असल्याचे कळविले आहे. त्यामुळे पुणे महानगरपालिकेच्या सर्व दवाखाने व रूग्णालयांमध्ये ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. याच कारणाने पुणे म.न.पा. च्या सन २०२३-२४ च्या अंदाजपत्रकात (०) शून्य रक्कम तरतूद करण्यात आली.
(४) मे. एचएलएल लाईफ केअर लि. या संस्थेमार्फत सर्व तपासण्या मोफत करण्यात येणार असल्यामुळे सदर योजनेकरिता भविष्यात तातडीने निधी उपलब्ध करून देण्याची सद्यस्थितीत आवश्यकता नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे येथील महानगरपालिकेच्या रुग्णालयातील वैद्यकीय शाखेतील रिक्त जागा भरण्याबाबत

**(४२) ६५९११ (२८-०८-२०२३). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे महानगरपालिकेच्या आरोग्य व्यवस्थेतील स्त्रीरोगतज्ञ, भूलतज्ञ आणि बालरोग तज्ञ या तीनही तज्ञांच्या निम्म्यापेक्षा अधिक जागा रिक्त असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आरोग्य अधिकारी, उप आरोग्य अधिकारी, सहाय्यक आरोग्य अधिकारी आणि वैद्यकीय अधीक्षक या चार प्रशासकीय पदासह वेगवेगळया ३० वैद्यकीय शाखेतील विशेष तज्ञांच्या १४२ मंजूर जागापैकी ३६ जागा भरल्या असून, १०५ जागा रिक्त असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, त्यानुषंगाने शासनाने सदर प्रकरणी माहिती घेऊन आरोग्य विभागातील इतर अधिकारी/कर्मचारी यांच्या रिक्त जागा भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१०-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) आरोग्य अधिकारी यांची नियुक्ती प्रतिनियुक्तीने करण्यात आली आहे, तसेच उप-आरोग्य अधिकारी पदाच्या ३ पैकी १ जागा पदोन्नतीने भरण्यात आली आहे. सहाय्यक आरोग्य अधिकारी पदाच्या ७ पैकी ६ (सरळसेवा २ आणि पदोन्नती ४) जागा भरण्यात आल्या आहेत. वैद्यकीय अधिक्षक पदाच्या २ पैकी २ (सरळसेवा १ अणि पदोन्नती १) जागा भरण्यात आल्या आहेत. अशा एकूण १२ पैकी ९ जागा भरण्यात आल्या आहेत.

दि.१७.०४.२०२० रोजी तज्ञ पदांसाठी एकूण (वर्ग-१ व वर्ग-२) १७७ पदांची जाहिरात देण्यात आली होती. त्यानुषंगाने १७७ पदांसाठी ९० पात्र उमेदवार यांना नियुक्ती देण्यात आली आहे, इतर पदांसाठी पात्र उमेदवार प्राप्त न झाल्याने ८७ जागा रिक्त आहेत.

(३) दि. ०६.०३.२०२३ रोजी आरोग्य विभागातील विविध रिक्त पदे भरणेबाबत सरळ सेवा भरतीबाबत जाहीर प्रकटन करण्यात आले असून त्यामध्ये क्ष-किरण तज्ञ व वैद्यकिय अधिकारी या पदांची पदभरतीची कार्यवाही चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात तसेच पुणे जिल्हयात शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेचा लाभ बनावट लाभार्थी घेत असल्याबाबत

**(४३) ६५९१४ (३१-०८-२०२३). श्री.रवींद्र धंगेकर (कसबापेठ), श्री.संजय जगताप (पुरंदर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात तसेच पुणे शहरात गरिबांना वैद्यकीय उपचार सुविधा उपलब्ध करुन देणाऱ्या शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजनेचा लाभ अनेक श्रीमंत घेत असल्याचे माहे एप्रिल, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वर्षाकाठी ५० हजार ते १ लाख रुपये मिळकत कर भरणारे या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करीत असल्याचे पुणे येथे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने माहिती घेऊन या योजनेचा गैरफायदा घेणाऱ्या बनावट लाभार्थींवर कारवाई करण्यासह या योजनेत पारदर्शकता आणण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१०-२०२३) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
(३) पुणे महानगरपालिकेकडून सप्टेंबर,२०२२ पासून शहरी गरीब वैद्यकीय सहाय्य योजना संगणकीकृत करण्यात आली आहे. या करीता नागरीकांचे कागदपत्रे अपलोड करून शहरी गरीब योजनेच्या कार्यालयात येऊन कागदपत्रे पडताळणी करण्यात येते व कागदपत्रांमध्ये संध्दिकता असल्यास अशा नागरीकांचे सभासदत्व नाकारण्यात येतात. असे ५२ नागरीकांचे सभासदत्व मिळकत कर जास्त दिसुन आल्याने नाकारण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## लातूर जिल्हयातील पाणी समस्या सोडविण्यासाठी उजनीहून पाणी आणण्याचा प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(४४) ६६१५३ (२४-०८-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर शहरामध्ये सन २०१६ मध्ये अभूतपूर्व पाणी टंचाई निर्माण झाल्यामुळे मयूरबन कॉलनी (अंबा हनुमान समोर) येथील रहिवाशांना पिण्याचे पाणी मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी उजनीहून पाणीपुरवठा करण्याची पर्यायी व्यवस्था करावी यासाठी महानगरपालिकेने शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रलंबित प्रस्तावाबाबत शासनाने माहिती घेऊन याप्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२७-०९-२०२३) :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) लातूर शहरास वारंवार पाणी टंचाईस सामोरे जावे लागत असल्याने कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून उजनी प्रकल्पातून पाणी पुरवठा करण्याकरीता प्रारुप प्रस्ताव दिनांक २९.११.२०१९ रोजी मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, औरंगाबाद यांनी अधिक्षक अभियंता, मध्यवर्ती नियोजन संकल्प चित्र व संनियंत्रण कक्ष, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना सादर केला आहे. सदर प्रस्ताव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नांदेड महानगरपालिका क्षेत्रातील तसेच शहरातील रस्ता दुरुस्तीकरीता निधी उपलब्ध करुन देण्याबाबत

**(४५) ६६१६० (२८-०८-२०२३). श्री.अशोकराव चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड महानगरपालिका क्षेत्रातील सुमारे १५० कोटी रुपयांच्या रस्त्यांची कामे सुरु होती परंतू शासनाने सदरील निधी देऊ नये अशा सुचना दिल्यामुळे रस्त्यांचे कामे प्रलंबित आहेत, हे खरे आहे काय,

(२) तसेच नांदेड शहरासाठी विशेष रस्ता दुरुस्तीअंतर्गत ७५० कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय

(३) असल्यास, सदरहू निधी वर्ग न केल्यामुळे शहरातील रस्ते, नाल्याची कामे प्रलंबित राहिल्याने नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने याबाबत आढावा घेऊन सदरील रस्ते व नाल्यांना निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०४-१०-२०२३) :** (१), (२), (३) व (४) शासनाकडून महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयीसुविधांचा विकास या योजनेतंर्गत क्र.मनपा २०२०/प्र.क्र.७३(६६)/ न.वि१६ दि. २९.०६.२०२२ च्या शासन निर्णयान्वये रु.४९.९९ कोटी व क्र.मनपा२०२१/प्र.क्र.८०(०१)/नवि-१६, दि.२९.०६.२०२१ च्या शासन निर्णयान्वे रु.९९.६० कोटी असा एकूण रु.१४९.५९ कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे.

शासन निर्णय दि.०१.०७.२०२२ अन्वये सदर कामांना तात्पुरती स्थगिती देण्यात आली होती.

याअनुषंगाने मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांच्याकडे याचिका क्र.१०१४१/२०२२ दाखल करण्यात आली होती. मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे दि. १२.०५.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थगिती उठविण्यात आली आहे. त्याचप्रमाणे मंजूर निधीपैकी रु.१०० कोटी निधी वितरीत केला असून उर्वरित निधी वितरणाची बाब विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पुणे महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता पदाच्या भरतीमध्ये अनेकांची बेकायदेशीररित्या निवड झाल्याबाबत

**(४६) ६६२५८ (२९-०८-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता पदाच्या भरतीमध्ये अनेकांची बेकायदेशीररित्या निवड झाल्याची बाब माहे मे, २०२३ वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पदासाठी ३ वर्षांचा बनावट अनुभव दाखला सादर केलेल्या उमेदवारांची निवड महानगरपालिकेने केल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर बेकायदा भरतीमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाला असून अनुभवाचे दाखले स्वीकारता त्यातील कॅश व्हाऊचर ग्राह्य धरल्याचा ही प्रकार निदर्शनास आला असून यामध्ये नियमानुसार पात्र होणाऱ्या उमेदवारांवर अन्याय झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी संबंधित भरती प्रक्रीयाचे उच्च त्रयस्थ संस्थेद्वारे परीक्षण करण्याची आवश्यकता असल्याने शासनाने सदर प्रकरणी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

तथापि, निवडयादी व प्रतीक्षायादी व नियुक्ती आदेशाबाबत काही तक्रारी प्राप्त झाल्या मात्र याबाबत सुनावणी घेवून त्या निकाली काढण्याकरीता पुणे महानगरपालिका स्तरावर चौकशी समिती गठीत करण्यात आली. चौकशी समितीने सर्व तक्रारीबाबत चौकशी समिती सुनावणी घेऊन चौकशी केली. फक्त ३ उमेदवारांचे बाबत अनुभवाचे अटीचे पालन झाले नसलेली बाब सिध्द झालेली असून उर्वरित तक्रारीबाबत कोणताही पुरावा सादर झालेला नाही. चौकशी समितीच्या अहवालानुसार सदर अनुभव शिक्षण घेत असलेल्या कालावधीतील असलेचे लक्षात घेवून तीन उमेदवाराना सेवेतून कमी करण्यात आले आहे. तथापि सदर उमेदवारांनी उच्च न्यायालयात दाद मागितली असून सदर बाब न्याय प्रविष्ठ आहे.
(३) हे खरे नाही.

सदर भरती प्रक्रियेत कोणताही आर्थिक गैरव्यवहार झालेला नाही.

उमेदवार लेखी परीक्षा देवून गुणानुक्रमे अग्रक्रमावर असल्याने कागदपत्र पडताळणी पथक व निवड समिती यांनी उमेदवाराने सादर केलेल्या कागदपत्रांची सर्वतोपरी खातरजमा करून पडताळणी करण्यात आली आहे. त्यानुसार अनुभवविषयी सिध्दतेचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जे उमेदवार गुणानुक्रमे खाली आहेत अशांवर अन्याय होत नाही.
(४) भरती प्रक्रिया शासन निर्णयाद्वारे सूचित IBPS या नामांकित संस्थेमार्फत पूर्ण करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील प्रकल्प बाधीतांना घरे मिळवून देण्याच्या नावाखाली मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये गैरव्यवहार सुरु असल्याबाबत

**(४७) ६६२७८ (३०-०८-२०२३). श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील प्रकल्प बाधीतांना घरे मिळवून देण्याच्या नावाखाली मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामध्ये करोडो रुपयांचा गैरव्यवहार सुरु असून कांही लोकांच्या संगनमताने प्रकल्पबाधीतांच्या यादीत बोगस नावे जोडून शासनाची घरे बोगस लोक बळकावित असल्याचे दिनांक २१ एप्रिल, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बाबतीत चौकशी करुन दोशींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी मा.मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्याकडे करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (२०-०९-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) दिनांक ११.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये यासंबंधी तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे. परंतु सदर प्रकरणाच्या अनुषंगाने चौकशी केली असता यामध्ये कोणतेही तथ्य आढळून आलेले नाही. प्रकरणी ६१ प्रकल्पग्रस्तांना झो.पु.प्रा. कडील प्राप्त सदनिका अद्याप वितरीत केलेल्या नाहीत. प्रकल्पग्रस्तांनी सादर केलेल्या पुराव्यांच्या अनुषंगाने तपासणी करुन सदनिका वितरीत करण्याची कार्यवाही प्राधिकरणाच्या नियमानुसार करण्यात येईल.

---

**पुणे वडगाव बुद्रुक येथे मुठा नदीच्या पूर रेषेत भराव टाकून बांधकामे सुरु असल्याबाबत**

**(४८) ६६२८३ (३०-०८-२०२३). श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील वडगाव बुद्रुक येथे मुठा नदीच्या पूररेषेत भराव टाकून बांधकामे सुरु असल्याचे माहे मे, २०२३ दरम्यान निदर्शनास आल्याचे खरे आहे काय,

(२) असल्यास, यादरम्यान मुळा-मुठा पाटबंधारे विभागाने आक्षेप घेऊन देखील १६ मजली इमारतीचे बांधकाम सुरु असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अशा अनियमित बांधकामांमुळे भविष्यात पूर स्थितीला सामोरे जावे लागण्याची दाट शक्यता असून अशाप्रकारे महापालिका अधिकारी नियमांचे उल्लंघन करून परवानग्या देत आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१०-२०२३) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही. मुळा मुठा नदीच्या पुररेषेत भराव टाकून बांधकामे सुरू असलेबाबत पाटबंधारे विभागाकडून पुणे महानगरपालिकेस कोणतेही आक्षेप प्राप्त झालेले नाहीत.

(३) हे खरे नाही. पुणे महानगरपालिकेमार्फत नियमांचे उल्लंघन करून बांधकामांना परवानग्या देण्यात येत नसल्याचे पुणे महानगरपालिकेने कळविले आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे महानगरपालिकेने फुरसुंगी उरुळी देवासाठी स्वंतत्र**
**नगरपालिका स्थापन करण्याबाबत**

**(४९) ६६३२८ (३१-०८-२०२३). श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विक्रमसिंह सावंत (जत), श्री.ऋतुराज पाटील (कोल्हापूर दक्षिण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.जितेश अंतापूरकर (देगलूर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेने फुरसुंगी उरुळी देवासाठी स्वंतत्र नगरपालिका स्थापन करण्यात निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जोपर्यंत येथे नवीन नगरपालिका अस्तित्वात व कार्यान्वित होत नाही तोपर्यंत येथे पाणीपुरवठा पावसाळापूर्व रस्ते दुरुस्ती इ. कामे पुणे महानगरपालिकेने कर्तव्य म्हणून करावीत अशी येथील नागरिक मागणी करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने निर्णय घेऊन शासनाने येथे नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (०९-१०-२०२३) :** (१) होय.
(२) होय.
(३) सदर दोन्ही गावंमध्ये अस्तित्वातील रस्त्यांवर पडणारे खड्डे बुजविण्याचे काम पुणे महानगरपालिका पथ विभागाच्या डांबर/ हॉट मिक्स प्लांट येथील मालातून वेळोवेळी करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### ठाणे जिल्ह्यातील भिवंडी-निजामपूर शहरात महानगरपालिकेचे प्रसूतीगृह उभारण्याबाबत

**(५०) ६८३९२ (२४-०८-२०२३). श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेचे स्वत:चे रुग्णालय अथवा दवाखाना नसल्याने शहरात घरगुती प्रसूतीचे प्रमाण वाढल्याचे दिनांक २२ मे, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, भिवंडी-निजामपूर शहर महानगरपालिकेच्या जन्म-मृत्यू नोंदीनुसार शहरात दररोज घरगुती प्रसूतीतून १० बालके जन्मास येत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भिवंडी-निजामपूर शहरात महानगरपालिकेचे प्रसूतीगृह उभारण्याबाबत प्रशासन व शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे (१९-१०-२०२३) :** (१) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका स्तरावर महानगरपालिका स्तरावरील माहिती नुसार माहे एप्रिल, २०२२ ते मार्च, २०२३ या कालावधीत सुमारे १२% घरी प्रसुती झाले असल्याचे निदर्शनास आले आहे. त्याचप्रमाणे माहे एप्रिल, २०२३ ते जुलै, २०२३ पर्यंत एकूण प्रसुतीपैकी १५% घरी प्रसुती झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका स्तरावर महानगरपालिका स्तरावरील माहिती नुसार घरगुती प्रसुतीतुन माहे जून, २०२३-४४५, माहे जुलै, २०२३-३५३ व माहे ऑगस्ट, २०२३-४७२ जन्म नोंदी आहेत.
(३) भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या बाई गुलबाई पेटीट दवाखाना येथे ३० बेड क्षमतेच्या आरोग्य केंद्राचे काम अंतिम टप्प्यात आहे.

शासनाने माता व बाल संगोपन करीता २०० बेड क्षमतेचे प्रसुतीगृह मंजूर केले असून शहरातील ५ प्रभागांमध्ये ५ डिलेवरी पॉईंट्स कार्यान्वित करण्याच्या दृष्टिने कार्यवाही सुरु असल्याची बाब भिवंडी महानगरपालिकेने कळविली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.